- संशोधकाचे नाव - श्रीमती पाटील स्मिता अशोक
- मोबाईल नंबर - 8830282199
- ई – मेल आय.डी. - smitapatil519501@gmail.com
- जात - मराठा
- विषयाचे नाव - समाजशास्त्र
- संशोधन विषयाचे शीर्षक - सामाजिक विकासाच्या प्रक्रियेत : जयंत दारिद्रय निर्मूलन अभियान या उपक्रमाचे समाजशास्त्रीय अध्ययन
- मार्गदर्शकाचे नाव - डॉ. भिसे रामचंद्र मुमाजी
- मोबाईल नंबर - 8275949041
- ई-मेल आय.डी. - bhise.ramchandra55@gmail.com

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मानवविज्ञान विद्याशाखेअंतर्गत
समाजशास्त्र विषयातील पीएच.डी. (Ph.D)
पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

संशोधन आराखडा

सामाजिक विकासाच्या प्रक्रियेत: जयंत दारिद्रय निर्मूलन अभियान या उपक्रमाचे समाजशास्त्रीय अध्ययन

संशोधक

पाटील स्मिता अशोक

(एम.ए., बी.एड्.)

मार्गदर्शक

डॉ. भिसे रामचंद्र मुंजाजी

एम.ए.एम.फिल.,पीएच.डी., नेट

समाजशास्त्र विभाग प्रमुख

दिगंबरराव बिंदू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

भोकर, जि. नांदेड

ऑगस्ट २०२३

प्रस्तावना

मानवी गरजा या सतत वाढणाऱ्या व अमर्यादीत असतात. मानवाच्या मूलभूत गरजा सुद्धा पूर्ण झाल्याशिवाय जीवन जगणे अशक्य असते. अर्थव्यवस्थेतील चढउतारामुळे तसेच चूकीच्या सामाजिक रचनेमुळे व्यक्ती किंवा समूह हा विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूर फेकला जातो. तेव्हा शासनाला किंवा सामाजिक संस्थांना दारिद्रय निर्मूलनासाठी उपाययोजना कराव्यात लागतात.

आपल्या मूलभूत गरजा जे पूर्ण करू शकत नाहीत अशा व्यक्ती व समूहाला दारिद्रयरेषेखालील लोक म्हणावे लागेल असे लोक उपासमारीच्या जवळपास टेकलेले असतात. त्यांचा राहणीमानाचा दर्जा खालावलेला असतो. दारिद्रय हे एक सापेक्ष कल्पना आहे. दारिद्रयाचे आपतकालीन दारिद्रय दीर्घकालीन सामूहिक दारिद्रय, दीर्घकालीन व्यक्तिगत दारिद्रय, निरपेक्ष दारिद्रय व सापेक्ष दारिद्रय असे दारिद्रय पडतात.

आदर्श राज्यव्यवस्थेमध्ये सर्वांचा विकास व्हावा. गरिबी व दारिद्रय हटावे ही जबाबदारी शासनाची असते. काही व्यक्ती व सामाजिक संघटना सुद्धा दारिद्रय निर्मुलनासाठी काम करत असतात.

दारिद्रय

दारिद्रय किंवा गरिबी ही भारतीय समाजावरील एक प्रमुख आव्हान असून ही समस्या आर्थिक व सामाजिक घटकांशी निगडीत आहे. काही व्यक्ती किंवा समूहाला विकासापासून वंचित करणारा घटक म्हणून दारिद्रयाच्या समस्येकडे पाहिले जाते.

दारिद्रयाचा अर्थ

पारंपारिक अर्थानुसार दारिद्रय म्हणजे समाजातील व्यक्ती पुरेशा उत्पन्ना अभावी अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजापूर्ण करू शकत नाही अशी स्थिती होय. भारतातील दारिद्रय हे बहुआयामी आहे. भारतात दारिद्रयाच्या निरपेक्ष दारिद्रय व सापेक्ष दारिद्रय अशा प्रमुख संकल्पना आहेत. निरपेक्ष दारिद्रय हे किमान

उपभोगाच्या गरजांनुसार मोजले जाते. नियोजन आयोगानुसार ग्रामीण क्षेत्रामध्ये प्रती व्यक्ती उष्मांकाचे प्रमाण २४०० उष्मांक असून शहरी क्षेत्रामध्ये २१०० उष्मांक इतके आहे. प्रत्येक व्यक्ती सरासरी २२५० उष्मांकाची गरज असते.विविध राहणीमानांच्या दर्जाची तुलना केल्यानंतर सापेक्ष दारिद्रयाची कल्पना येते. या दारिद्रयाचा अभ्यास उत्पन्न पातळी, संपत्ती, उपभोग खर्च आर्थिक निष्क्रियता यांच्या परस्पर तुलनेतून केला जातो.

स्वातंत्र्यानंतर काळात दारिद्रय निर्मुलन कार्यक्रमावर भारत सरकारने भर दिला आहे. दारिद्रय निर्मुलनासाठी भारत सरकारने आर्थिक नियोजन, आर्थिक सुधारणा, गरीबी हटाओ यासारखे दारिद्रय निर्मुलन कार्यक्रम राबविले आहेत.

महाराष्ट्र रोजगार अधिनियम १९७७

भारताच्या राष्ट्रपतींनी १ ऑक्टोबर १९७८ मध्ये महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ वर सही केली व त्याची अंमलबजावणी सुरू झाली.

दारिद्रय निर्मुलनासाठी कार्यक्रम

१. बुध्दीधारित दृष्टीकोन

२. दारिद्रय निर्मुलन कार्यक्रम

३. किमान मूलभूत सुविधांची तरतूद

आंतरराष्ट्रीय दारिद्रय निर्मुलन दिवस १७ ऑक्टोबर

दारिद्रय निर्मुलनासाठी माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी २०कलमी कार्यक्रम जानेवारी १९८२ मध्ये सुरू केला. हा दारिद्रय निर्मुलन कार्यक्रम राबविण्यासाठी सांगली जिल्हयाच्या जयंत दारिद्रय निर्मुलन अभियान या स्वयंसेवी संस्थेने वेगवेगळे उपक्रम राबविलेले आहेत. त्याचा आढावा होण्याच्या दृष्टीने संशोधन करण्याचे निश्चित केले आहे.

संशोधनाचे महत्त्व :-

प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेला विषय हा गरिबीत जीवन जगणाऱ्या व्यक्तींच्या वा समाजाच्या विकासासाठी काम करणाऱ्या एका स्वयंसेवी संस्थेचा आहे. आर्थिक व सामाजिक विकासात भर टाकणारा आहे. कुठलेही समाजशास्त्रीय संशोधन हे प्रस्थापित ज्ञानामध्ये नवीन भर टाकण्याचे कार्य करीत असते. जयंत दारिद्रय निर्मुलन अभियानाचा संदर्भात अभ्यास करण्यामागील उद्देश देखील अशाच प्रकारे नवीन ज्ञानाचा, शोध घेण्याचा आहे. एकतर विषय संशोधकांच्या आवडीचा असतो किंवा त्या विषयाबाबत संशोधनकर्त्यांस शास्त्रीय उत्सुकता असते. म्हणून एखादा विषय संशोधनकर्ता निवडतो, एखादी योजना, अभियान त्यांचे फायदे जास्तीत जास्त गरजु व्यक्तींपर्यत पोहचावेत व ते आव्हान स्विकारल्यामुळे संशोधक एखादे संशोधन कार्य हाती घेतो.

जयंत दारिद्रय निर्मुलन यांचे पश्चिम महाराष्ट्रात मोठे काम असून त्या कामाचे संशोधन होणे गरजेचे आहे. या अभियानाची भूमिका, उद्दिष्टये, यश अपयश यांचे अन्वेषण होणे आवश्यक आहे. या अभियानाची दिशा समजून घेण्यासाठी, त्यांचे काम राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर नेण्यासाठी सदरचे संशोधन आवश्यक वाटते. देशात अनेक गैरसरकारी संस्था कार्यरत असून त्यांचे उद्दिष्ट गरीब लोकांना मदत करणे व त्यांची अडचण व समस्या सोडविणे असते. शासकीय सुविधा, आरोग्य, शैक्षणिक, रोजगार इत्यांदीचा लाभ लोकांपर्यंत पोहचवणे हे असते.

उदा. सिनेअभिनेते अमीर खानचे 'पाणी फाऊंडेशन', सिनेअभिनेते सलमान खानचे 'बीइंग हयुमन फाऊंडेशन', आण्णा हजारेंची 'भ्रष्टाचार विरोधी कार्य करणारी संस्था', रिप्पन कपूर यांची 'चाईल्ड राईट्स ॲण्ड यू', अंशू गुप्ता यांनी स्थापन केलेली 'गुंज' इत्यादी अनेक गैरसरकारी संस्था कार्यरत आहेत. त्याचप्रमाणे जयंत दारिद्रय निर्मुलन अभियान सुध्दा मोठया प्रमाणात कार्यरत असून त्याचे समाजशास्त्रीय संशोधन होणे गरजेचे आहे.

गैरसरकारी संस्था देशाच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असतात. राज्यातील सर्व गरीब कुटुंबापर्यंत पोचून त्यांना कायमस्वरुपी उपजिविकेच्या संधी उपलब्ध करणे व गरिबी रेषेच्या वर येईपर्यत त्यांनामदतीचा हात देवून त्यांचे जीवनमान उंचवण्यासाठी सर्वतोपरी मदत करणे हा या अभिमानाचा उद्देश आहे. सांगली जिल्हयात वाळवा तालुक्यामध्ये काम करणारी जयंत दारिद्रय निर्मुलन अभियान ही एक महत्वपूर्ण अभियान आहे. हे अभियान जात, धर्म, पक्ष असा कोणताही भेदभाव न करता निरपेक्ष भावनेने काम करते.

सध्या महागाई वाढली आहे. शस्त्रक्रिया अवयव रोपण यासारखे खर्च गोरगरिबांना परवडत नाहीत व कौटुंबिक व सामाजिक समस्या वाढल्या आहेत. अशावेळी जयंत दारिद्रय निर्मुलन अभियान महत्वपूर्ण काम करीत आहे. सांगली जिल्हयाचा सामाजिक विकासामध्ये भर घालण्यासाठी जयंत दारिद्रय निर्मुलन अभियान या स्वयंसेवी संस्थेने महत्त्वपूर्ण योगदान दिलेले दिसून येते. सांगली जिल्हयातील वाळवा, मिरज या तालुक्यातील लोकांचे जीवनमान सुधारण्यासाठी शैक्षणिक सामाजिक आर्थिक दर्जा सुधारण्यासाठी या संस्थेचे योगदान महत्वपूर्ण ठरलेले आहे. त्यामुळे संशोधन विषयाचे महत्त्व वरील प्रमाणे लक्षात येते.

समस्या व स्वरुप :-

सांगली जिल्हयातील वाळवा, मिरज तालुक्यातील लोकांच्यामध्ये अनेक कारणांनी चुकीच्या धारणा शिक्षणाचा अभाव उत्पन्नाची तोकडी साधने अनारोग्य अशा समस्यामुळे जीवनमान मागासलेले आहे. त्यामुळे दारिद्रयाचे प्रमाण त्याच्यामध्ये अधिक आहे. त्यामुळे हजारो समाजसेवी संस्था, लाखो सामाजिक कार्यकर्ते शासन प्रशासन यांचे अखंड प्रयत्नही संघटित स्वरुपाचे नसतात त्यामुळे अनेक मुलभूत प्रश्न वरील तालुक्यामध्ये दिसून येतात.

१. सरकारने दारिद्रय निर्मुलनासाठी असंख्य कार्यक्रमांची सुरुवात केली तरी या कार्यक्रमामध्ये सुत्रबध्दता नसल्याने अव्यवस्था असल्याने असंख्य समस्या निर्माण झाल्या.

२. शेती उत्पादन व उत्पादकतेला सरकारने प्राथमिकता दिली असली तरी सामाजिक व अर्थिक विषमता कमी झालेली नाही व उत्पादनातील असमानताही तशीच राहिलेली आहे. कारण या योजनांचे फायदे देशातील सर्व विभागात समान पध्दतीने दारिद्री लोकांपर्यत जावून पोहोचलेले नाहीत. पाणीपुरवठा, कर्ज अनुदार व अन्य सुविधा काही मोठया शेतकऱ्यांना या बाबी अधिक किंमत देवूनच खरेदी कराव्या लागतात.

३. विविध कार्यक्रमांना जवाहर रोजगार योजनेत समाविष्ट करुन देखील शासन पंचायतींना वेळोवेळी अनुदार उपलब्ध करुन देवू शकत नाही.

४. कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी नेमलेल्या अधिकाऱ्यांचा सरकारने निश्चित केलेल्या उद्देशाबाबत अविश्वास आहे. त्यामुळे ती आपली भूमिका प्रामाणिकपणे पार पाडत नाहीत.

५. लोक ज्यांच्यासाठी हे विविध कार्यक्रम शासन राबवते. त्यांचाही या कार्यक्रमातील सहभाग अत्यंत नगण्य आहे. दारिद्रय निर्मुलनाचा कार्यक्रमयशस्वी होण्यासाठी जनतेचे सहकार्य व प्रत्यक्ष सहभाग महत्वाचा असतो. तो फारसा असलेला आढत नाही.

वरील विविध कारणांमुळे दारिद्रय निर्मुलनाच्या कार्यक्रमांना अपयश येत असले तरी जयंत दारिद्रय निर्मुलन हा एक कार्यक्रम हाती घेवून हे अपयश दूर करण्याचा प्रयत्न करत आहे. आत्तापर्यंत जयंत दारिद्रय निर्मुलन अंतर्गत दारिद्रय रेषेखालील ५४६३५ लाभार्थ्यांना लाभ देण्यात यश आले आहे. शासन हे कार्यक्रम बंद करु शकनार नाही. उलट सर्व बाबींचा सखोलपणे विचार करुन येणाऱ्या

अडथळयांवर मात करुन शासन व इतर स्वयंसेवी संस्थांनी नव्या जोमाने व आत्मविश्वासाने या कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

१. जयंत दारिद्रय निर्मुलन अभियान या स्वयंसेवी संस्थेच्या स्वरूप व व्याप्तीचा अभ्यास करणे.

२. जयंत दारिद्रय निर्मुलन अभियानातील सांगली जिल्हयातील कार्याचा आढावा घेणे.

३. जयंत दारिद्रय निर्मुलन अभियानाचे सामाजिक जीवनातील शैक्षणिक व आर्थिक विकासाचा आढावा घेणे.

४. जयंत दारिद्रय निर्मुलनाच्या अभियानातील संख्यात्मक व गुणात्मक बाबींची चिकित्सा करणे.

५. जयंत दारिद्रय निर्मुलन अभियान या स्वयंसेवीसंस्थेने लाभार्थी कुटूंबांसाठी केलेल्या आर्थिक व सामाजिक, राजकीय जीवनातील सहभाग कार्याचा आढावा घेणे.

संशोधनाची गृहितके

१. जयंत दारिद्रय निर्मुलन अभियानातील कार्याच्या आढाव्यामुळे समाजपरिवर्तनाला गती मिळालेली दिसून येते.

२. जयंत दारिद्रय निर्मुलन अभियान या स्वयंसेवी संस्थेची भूमिका सांगली जिल्हयाच्या सामाजिक व आर्थिक विकासासाठी महत्वपूर्ण दिसून आलेली आहे.

३. जयंत दारिद्रय निर्मुलन अभियानामुळे अविकसित क्षेत्राच्या विकासासाठी प्रयत्न होवून आर्थिक असमानता दूर झलेली दिसून आलेली आहे.

४. जयंत दारिद्रय निर्मुलन अभियान उपक्रमामुळे विविध सामाजिक समस्यावर निरपेक्षपणे उपाय शोधले गेलेले आहेत.

५. समाजातील नव्या समस्या व प्रश्न या अभियानाच्या माध्यमातून सोडविल्या जात आहेत.

६. जयंत दारिद्रय निर्मुलन अभियानातील विविध उपक्रमांमुळे लाभार्थींच्या राजकीय जीवनातील सहभाग वाढलेला आहे.

संशोधन अभ्यासाची व्याप्ती व कालावधी

जयंत दारिद्रय निर्मुलन अभियान प्रस्तुत संशोधनाचे हे क्षेत्र पश्चिम महाराष्ट्रात असून सन २००६ ते २०२३ सालापर्यंत केलेल्या कामाचे संशोधन केले जाणार आहे. प्रस्तुत संशोधनामध्ये जयंत दारिद्रय निर्मुलन अभियानाच्या मदतीने ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपरिषद, राज्य व केंद्र शासनाच्या सर्व शासकीय अंमलबजावणीचा अभ्यास केला जाणार आहे.

सदरच्या अभियानाने आरोग्य, शिक्षण, रोजगार, गृहबांधणी, व्यसनमुक्ती व शासकीय लाभ इत्यादी क्षेत्रात केलेल्या कामाचा अभ्यास केला जाणार आहे.

सदर संशोधन हे विषय समाजशास्त्र याचे अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीच मर्यादित असेल. प्रस्तुत संशोधनात समाविष्ट असणाऱ्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीवर नियंत्रण ठेवणे अशक्य आहे. प्रस्तुत संशोधन सांगली जिल्हयातील दारिद्रय निर्मुलन अभियानाचे अध्ययन करण्यासाठी परिमर्यादित असेल.

संशोधन पध्दती

संशोधन म्हणजे कोणत्याही ज्ञान शाखेतील नवीन तथ्य अथवा तत्त्वेशोधण्यासाठी आणि जुनी तत्वे यांचे परीक्षण करण्यासाठी केलेला चिकित्सक व पध्दतशीर अभ्यास होय. प्रत्येक संशोधन विषयात ज्या संकल्पना सिध्दांत निष्कर्ष स्विकृत झालेले आहेत त्याचे प्रामाण्य पुन्हा पुन्हा तपासून पाहणे हे अभ्यासकाचे काम असते. जे सिध्दांत विभिन्न शाखात प्रस्थापित झालेले आहेत. त्यांची विश्वासार्हता तपासून पाहण्याची तसेच नवीन तथ्यांच्या आधारे सिध्दांतात बदल करण्यासाठी देखील आवश्यकता पडते. प्रस्तुत संशोधन विषयासाठी खालील संशोधन आराखडयाचा उपयोग करण्यात येणार आहे.

गुणात्मक पध्दत

संशोधकाला आपल्या स्वतःच्या पुर्वग्रहाचा प्रभाव पडू न देता तथ्य सामुग्रीचे विश्लेषण करावे लागते. संकलित केलेल्या तथ्य सामुग्रीचे शास्त्रीय दृष्टीकोनातून विश्लेषण करणे सुध्दा गरजेचे असते.गुणात्मक तथ्य सामुग्रीचे वैज्ञानिक तथ्यात रुपांतर करणे गरजेचे असते. आशय विश्लेषणाने गुणात्मक विषयाचे परिणामात्मक अध्ययन करणे शक्य होते. प्रचार-प्रसार माध्यमे, चित्रे, नकाशे, फोटो, मुलाखती व संदर्भ ग्रंथ इत्यादी गुणात्मक तथ्यांचे विश्लेषण करण्यासाठी संशोधनकाने वर्णनात्मक आराखडयाचा अवलंब केला आहे, ज्या तथ्यांना आकडे किंवा संकेत मांडता येत नाहीत अशा तथ्यांचे वर्गीकरण गुणात्मक आधारावर केले जाते.

संख्यात्मक पध्दत

संशोधनासाठी आधार सामग्रीचे संकलन, मापन, व्यवस्थापन आणि अर्थनिर्वचन, संख्यात्मक स्वरुपात करणे म्हणजे संख्यात्मक संशोधन होय. संख्यात्मक संशोधन पध्दतीमध्ये विविध साधनांचा व तंत्राचा वापर करुन आणि विविध संख्याशास्त्रीय तंत्राद्वारे संशोधनपूर्वक माहितीचे विश्लेषण करुन निष्कर्ष प्राप्त केले जातात. व प्राप्त निष्कर्षांचे अर्थनिर्वचन केले जाते. संख्यात्मक संशोधनात सर्वेक्षणसंशोधन, संबंधात्मक संशोधन तुलनात्मक संशोधन या संशोधन पध्दतीचा ही समावेश होतो.

वस्तुनिष्ठ वा वैज्ञानिक विश्लेषण करण्यासाठी वर्णनात्मक विश्लेषण करणे महत्त्वपूर्ण असते. याद्वारे संतुलित दृष्टीकोन व मितव्यतता येण्यासाठी वर्णनात्मक विश्लेषण करणे गरजेचे असते. त्याद्वारे संशोधन कार्य विद्यार्थी, संशोधक, धोरणकर्ते व सामान्य वाचकापर्यंत नेणे सोपे जाते. तसेच गृहित कृत्याचे परीक्षण करणेही सोपे जाते.

सैध्दांतीक आधार

समाजशास्त्राचा विविध शाखापैकी सामाजिक विकासाचे समाजशास्त्र या शाखेअंतर्गत या मुलभूत संकल्पनेचा आधार घेवून हे संशोधन पूर्ण केले जाईल.

नमुना निवड

जयंत दारिद्रय निर्मुलन अभियान या स्वयंसेवी संस्थेने सांगली जिल्हयातील एकूण ५४६३५ लाभार्थी कुटूंबे आहेत. त्यापैकी वाळवा, मिरज तालुक्यातील सुमारे १२००० लाभार्थी आहेत. त्यापैकी सहेतूक नमूना निवड पध्दतीने मी प्रत्येक तालुक्यामधून १५० या प्रमाणे एकूण ३०० लाभार्थी नमूना म्हणून निवड करण्यात येईल.

तथ्य संकलनाचे स्त्रोत

प्रस्तुत संशोधन अध्ययनासाठी पुढील प्रमुख स्त्रोतांचा वापर करुन विश्वसनिय माहितीप्राप्त करण्याचा प्रयत्न केला जाईल.

अ) प्राथमिक सामुग्री

जेव्हा संशोधनकर्ता स्वतः त्या क्षेत्रात जाऊन त्या समस्येच्या संबंधात व्यक्ती कडून मुलाखत, अनुसूची फोटोग्राफ या माध्यमाने किंवा प्रत्यक्ष निरीक्षणाद्वारे माहिती किंवा तथ्य जमा करतो त्यास प्राथमिक तथ्य म्हणतात. प्राथमिक तथ्य ही संशोधकन कर्त्याने स्वतः जमा केलेली असल्यामुळे वस्तुनिष्ठ असतात. प्राथमिक तथ्य संकलनाचे मुलाखत अनुसूची, फोटोग्राफ , निरीक्षणतंत्र ही साधने आहेत.

ब) दुय्यम सामुग्री

इतरांनी केलेल्या माहितीचा उपयोग करुन केल्या जाणाऱ्या तथ्यांना दुय्यम सामुग्री असे म्हणतात. दुय्यम सामुग्रीमध्ये वैयक्तिक कागदपत्रे, आत्मचरित्रे, नियतकालिके इत्यादी दुय्यम सामग्रीचा समावेश होतो. प्रा. रॉबर्टसन आणि राईट यांच्या मते “विशिष्ट संशोधन समस्येचा उहापोह करण्याच्या हेतूसाठी जी माहिती

दुसऱ्याने जमा केलेली असते पण जिचा उपयोग संशोधन प्रकल्पात करुन घेतला जातो त्या माहितीस दुय्यम सामुग्री असे म्हणतात.” दुय्यम सामुग्री संशोधकाने स्वतः संकलित केलेली नसते तर ती इतर संशोधक अभ्यासक यांनी संकलित केलेली असते. जिचा वापर संशोधक आपल्या संशोधन कार्यासाठी करुन घेत असतो.

“जयंत दारिद्रय निर्मुलन अभियानांचे समाजशास्त्रीय अध्ययन या संशोधन विषयासाठी तथ्य संकलन करताना प्राथमिक तसेच दुय्यम सामुग्रीचा उपयोग करण्यात येणार आहे. प्राथमिक तथ्य संकलनासाठी मुलाखत, अनुसुची, प्रत्यक्ष निरीक्षणाचा उपयोग करण्यात येणार असून दुय्यम सामुग्रीमध्ये पुस्तके, नियतकालिके, वर्तमानपत्रे, मासिके, अहवाल, इंटरनेटवरील, माहितीचा उपयोग करण्यात येणार आहे.

तथ्यांचे विश्लेषण

तथ्य हे प्राथमिक तसेच दुय्यम अशा प्रकारचे असते. हे तथ्य संकलन करण्याचे विविध साधने असतात. मुलाखत, निरीक्षण व अनुसूची अशा विविध पध्दतीचा तथ्य संकलनासाठी उपयोग करण्यात येतो. परंतु फक्त तथ्य संकलन करुन संशोधन कार्य पूर्णत्वास जावू शकत नाही. त्यासाठी संकलित केलेल्या तथ्याचे विश्लेषण करुन निष्कर्ष काढावे लागतात. तथ्याच्या विश्लेषणासाठी सामाजिक शास्त्रात विविध तंत्राचा उपयोग करण्यात येतो. यामध्ये संकलित माहितीची सरासरी, टक्केवारी काढली जाते. तथ्यांच्या विश्लेषणासाठी गुणात्मक तसेच सांख्यिकीय तंत्राचा ही आवश्यकतेप्रमाणे उपयोग करण्यात येतो.

प्रस्तुत संशोधनामध्ये तथ्यांचे विश्लेषण काढून निष्कर्ष काढण्यासाठी गुणात्मक व संख्याशास्त्रीय अशा दोन्ही प्रकारच्या तंत्राचा वापर करण्यात येणार आहे. प्रस्तुत संशोधनामधून कुटुंबातील अर्थिक सामाजिक, शैक्षणिक, व्यसनाबाबत, स्वयंरोजगार समस्या जाणून गुणात्मक तंत्राचा वापर करण्यात येणार आहे. तसेच आरोग्य, शिक्षण व्यसनमुक्ती शासकीय व निमशासकीय लाभ विविध उपग्रक नोकरी

सहाय्य, गृहबांधणी, दारिद्रय रेषेतून वर आलेली कुटुंबसंख्या यांची लाभार्थी संख्या, रुपये, तपशील, ग्रामीण व शहरी विभागातील प्रमाण व टक्केवारी यासाठी संख्यात्मक तंत्राचा वापर करण्यात येणार आहे.

संशोधन अहवालाची मांडणी

प्रस्तुत संशोधन अहवालाची प्रकरण रचना पूढील प्रमाणे केलेली आहे.

प्रकरण पहिले - प्रस्तावना

इस्लामपूर मतदार संघाचे आमदार माननीय जयंत राजाराम पाटील यांच्या संकल्पनेतून लोकहित साधण्याच्या दृष्टीने जयंत दारिद्रय निर्मूलन अभियानाची सुरुवात सन २००६ साला पासून झाली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु करण्यात आलेले हे अभियान सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्हयातील लोकांच्या पर्यत पोहोचले आहे. आरोग्य, शैक्षणिक, रक्तदान शिबीरे, कृत्रिम अवयव रोपण, स्वयंरोजगार सहाय्य, गृहबांधणी इत्यादी अनेक विषयावर हे अभियान काम करत आहे. हजारो लोकांना या अभियानाचा फायदा झाला आहे. आरोग्य, शिक्षण स्वयंरोजगार, व्यवसन मुक्ती व विविध योजनांचा लाभ हजारो कुटुंबाना मिळाला आहे. सांगली जिल्हयातील तालुका वाळवा, मिरज सदर संशोधनासाठी निवडलेले आहे. तो संपूर्णत: अभ्यास जयंत दारिद्रय निर्मुलन अभियान या स्वयंसेवी संस्थेची भूमिका निदर्शनास आणून देणारा आहे.

प्रकरण दुसरे - संशोधन पध्दती व संबंधित साहित्याचा आढावा

प्रस्तुत प्रकरणात वाळवा, मिरज तालुक्यातील जयंत दारिद्रय निर्मुलन अभियानातील कार्याचे आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक अध्ययन करताना या संशोधनाला शास्त्रीय दर्जा प्राप्त व्हावा यासाठी संशोधनाच्या वेगवेगळया पध्दती वापरुनच हे संशोधन पूर्ण करण्यात येईल यामध्ये संशोधनात्मक, पध्दत गुणात्मक पध्दत आणि संख्यात्मक पध्दत यासारख्या पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

प्रकरण तिसरे :- जयंत दारिद्रय निर्मुलन अभियान या स्वयंसेवी संस्थेची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विकासात भूमिका (प्राथमिक तथ्य संकलनावर आधारित)

प्रस्तुत प्रकरणात प्रस्तावना स्पष्ट करुन सामाजिक विकासाच्या प्रक्रियेत जयंत दारिद्रय निर्मुलन अभियानाच्या अंतर्गत दारिद्रय रेषेखालील कुटूंबाना मिळणारा लाभ व या अभियानांतर्गत लाभ मिळवून देण्यासाठी प्राप्त तथ्यांचे वर्गीकरण व विश्लेषण करण्यात आलेले आहे. या अभियानांतर्गत दारिद्रय रेषेखालील कुटूंबांना देण्यात आलेली स्वयंरोजगार, शिक्षण, गृहबांधणी, नोकरी या क्षेत्रातील लाभार्थ्यांची संख्या खालीलप्रमाणे

१. स्वयंरोजगार - १९७४

२. शिक्षण – ५२४४८

३. गृहबांधणी – २५७९

४. नोकरी- २६१७

प्रकरण चौथे - जयंत दारिद्रय निर्मुलन अभियान या स्वयंसेवी संस्थेची आरोग्य, राजकीय, जीवनातील सहभाग व्यसनमुक्ती व विविध उपक्रमाची विकासात भूमिका (प्राथमिक तथ्य संकलनावर आधारित)

प्रस्तुत संशोधनाच्या माध्यमातून दारिद्रय रेषेखालील व त्यासारखी परिस्थीती असणा-या आरोग्य, व्यसन तसेच विविध समसया जाणून घेवून त्यास मस्या सोडवण्याचे काम सुरु असून ते अधिक प्रमाणात होण्यासाइी या संशोधनाच्या माध्यमातून अनेक उपक्रम गरजू लोकांपर्यंत पोहचवले जातील. या अभियानांतर्गत दारिद्रय रेषेखालील कुटूंबाना देण्यात आलेले आरोग्य, व्यसन, तसेच विविध उपक्रमांतर्गत लाभार्थी संख्या खालीलप्रमाणे

आरोग्य – ६४०६ व्यसनमुक्ती - १४३६

विविध उपक्रम - १५२०

प्रकरण पाचवे – निष्कर्ष, सूचना व शिफारशी

प्रस्तुत संशोधन अध्ययनातून मिळालेल्या माहितीच्या आधारे आर्थिक सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य क्षेत्रात लाभार्थी कुटूंबाच्या माहितीचे संकलन करणे तसेच लाभापासून वंचित राहिलेल्या कुटूंबाना लाभ मिळवून देणे तथ्यांचे विश्लेषण करुन प्रमुख व निष्कर्ष देण्यात येतील व त्याआधारावर योग्य सूचना व शिफारसी करण्यात येतील.

संदर्भसूची

१. आगलावे प्रदीप, (१ जानेवारी २०२०) सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे – श्री साईनाथ प्राकशन, नागपूर.

२. जयंत दारिद्रय निर्मुलन अभियान राजारामनगर (कार्यपुस्तिका-२०१८) राजारामबापू ज्ञानप्रबोधिनी (इस्लामपूर) संचलित अध्यक्ष शामराव पाटील (२०१८).

३. जयंत दारिद्रय निर्मुलन अभियान लघु संशोधन प्रकल्प (जून २०१५). - प्रा. पाटील रमेश एच.

४. जयंत दारिद्रय निर्मुलन अभियान कार्यपत्रिका (२३ ऑक्टोंबर २०२२) जयंत पाटील.

५. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवाल (२००७-०८) अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.

६. महाराष्ट्र शासनाचा जी. आर., राष्ट्रीय ग्रामविकास विभाग शासन परिपत्रक क्रमांक मंजिअ २०१३/प्र.क्र. २३४ / योजना ३.

७. सुधीर बोधनकर – सामाजिक संशोधन पध्दती- श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर

८. वर्तमानपत्रे : दैनिक पुढारी.

९. वर्तमानपत्रे : दैनिक लोकमत.

१०. वर्तमानपत्रे दैनिक सकाळ

११. www.mr.vikaspedia.in

संशोधक मार्गदर्शक

डॉ. भिसे रामचंद्र मुंजाजी

एम.ए.एफ.फिल.पीएच.डी. नेट

समाजशास्त्र विभाग प्रमुख

दिगंबरराव बिंदू कला, वाणिज्य व विज्ञान

महाविद्यालय,भोकर जि. नांदेड

संशोधन विद्यार्थिनी

पाटील स्मिता अशोक

(एम.ए. बी.एड्.)